# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 State University Governed by Maharashtra University Act, 1994 )

## Office of the Director Students' Welfare

**Dr.I.S. Mohurley**
**Director**
Mobile: 7774027661, 9422893555

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
**Email :** director.studentwelfaregug@ gmail.com


NO/DSW-SJ/2015 Date- 05/06/2015

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.

**विषय :– महाविद्यालयामध्ये ग्रामगीता जीवन विकास परीक्षांचा उपक्रम राबविणेबाबत.**

**संदर्भ :– शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र.२५४/विशि–३ उच्च व तंत्रशिक्षण विभाग दि. : १३/५/२०१५.**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भांकीत विषयांवरील अखिल भारतीय श्री. गुरुदेव सेवामंडळ शाखा कळमेश्वर यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांना पाठविलेल्या पत्राची प्रत, परीक्षांचे माहीती पत्र व पोस्टर आपल्या माहीती करीता व योग्य त्या कार्यवाहीसाठी आपणाकडे पाठविण्यात येत आहे.

सदर बाबतीत वंदनीय राष्ट्रसंतांच्या समग्र वाङमयावर आधारित ग्रामगीता जीवन विकास परीक्षांचा अत्यंत स्तुत्य व काळाची गरज असलेला उपक्रम आपल्या महाविद्यालयातील ईच्छुक विद्यार्थ्यांकरीता राबवुन गुरुदेव सेवा मंडळाच्या या कार्यास सहकार्य करावे, ही विनंती.

धन्यवाद !

डॉ. ईश्वर मोहुर्ले
संचालक विद्यार्थी कल्याण

संचालक
विद्यार्थी कल्याण विभाग,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

|| श्री गुरूदेव ||



वं. राष्ट्रसंत श्रीतुकडोजी महाराज
गुरुकुंज, मोझरी, ता. तिवसा, जि. अमरावती

गावा-गावासी जागवा। भेदभाव समूळ मिटवा।
उजळा ग्रामोन्नतीचा दिवा। तुकडया म्हणे ।। ग्रामगीता ।।

# अ. भा. श्रीगुरूदेव सेवा मंडळ शाखा कळमेश्वर

रजि क्रं. ३६०३/८३३ दि. ९/०९/२००२

|| समर्थ ||



श्री संत लहानुजी महाराज
टाकरखेड, ता. आर्वी, जि. वर्धा

संपर्क पत्ता : श्री संत लहानुजी महाराज मंदिर, एम. आय. डी. सी. रोड कळमेश्वर, जि. नागपूर मोबा. : ९४२२१०१९९२

मुख्यमंत्री सचिवालय टपाल शाखा
17 MAR 2015
ई ऑफिस क्र. 9507

उच्च व तंत्र शिक्षण विभाग
कार्यासन उस (माशि)
दिनांक 20/3/2015

प्रति,

मा.ना. देवेंद्रजी फडणवीस,
मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य मुंबई

विषय :- महाराष्ट्रातील सर्व महाविद्यालये, विद्यालये, उच्च प्राथ. शाळा, व औ.प्र. संस्था यामध्ये ग्रामगीता जीवन विकास परिक्षांचा उपक्रम शासन स्तरावर राबविणेबाबत.

महोदय,

आजकाल सर्वाच्या गरजा आवश्यकतेपेक्षा जास्त वाढलेल्या आहे. वैयक्तीक भावना वाढणारे वातावरण निर्माण झालेले आहे. राष्ट्राची भावी पिढी(विद्यार्थी) उपभोगाकडे, विषयासक्तीकडे, शृंगाराकडे, नटवेषाकडे, कार्मिक चित्रपट, कांदब-याकडे, व्यसनी व चैनीकडे आणि अति झाल्यावर आत्महत्येकडे झुकलेली आहे. त्यांना मौज करणे हेच जीवन ध्येय वाटू लागले आहे. हे प्रतिकूल वातावरण निर्माण होण्याचे मुख्य कारण म्हणजे सुसंस्काराचा, मुल्य शिक्षणाचा व आदर्शाचा अभाव म्हणून वं. राष्ट्रसंत ग्रामगीतेत म्हणतात.

'ऐसे वातावरण जरी असले। तरी हृदयवंताने पाहिजे सुधारले।
आपुले गाव बिघडू दिले। ऐसे न करावे सुज्ञाने।।'

सर्व समाजाची विस्कटित झालेली घडी दुरूस्त करण्याची ताकत वं. राष्ट्रसंताच्या साहित्यात आहे.

..२..

।। श्री गुरूदेव ।।



ट्रसंत श्रीतुकडोजी महाराज
, मोझरी, ता. तिवसा, जि. अमरावती

गावा-गावासी जागवा। भेदभाव समूळ मिटवा।
उजळा ग्रामोन्नतीचा दिवा। तुकडया म्हणे ।। ग्रामगीता ।।

# अ. भा. श्रीगुरूदेव सेवा मंडळ शाखा कळमेश्वर

रजि क्रं. ३६०३/८३३ दि. ९/०९/२००२

।। समर्थ ।।



श्री संत लहानुजी महाराज
टाकरखेड, ता. आर्वी, जि. वर्धा

संपर्क पत्ता : श्री संत लहानुजी महाराज मंदिर, एम. आय. डी. सी. रोड कळमेश्वर, जि. नागपूर मोबा. : ९४२२१०१९९२




आजची प्रतिकुल शिक्षण पध्दती आणि वं. राष्ट्रसंताचे वरील संदेश विचारात घेऊन शाळा कॉलेजातील विद्यार्थ्यांना वं. राष्ट्रसंताच्या समग्र वाड्मयावर आधारित ग्रामगीता जीवन विकास परिक्षांचा अत्यंत स्तुत्य व काळाची गरज असलेला उपक्रम सुरू केलेला आहे. तथापी हा उपक्रम शाळा, कॉलेज, औ.प्र. संस्था मधून राबवितांना ब-याच शाळा, कालेजातील शिक्षक या उपक्रमाकडे दुर्लक्ष करून टाळाटाळ करतात. वास्तविक संताचे सांगणे प्रेमाचे, सरकारचे सांगणे दंडुक्याचे, तत्वत: दोघांचाही उद्येश व ध्येय एकच असून समाज सुधारणेकरीता या दोन्ही शक्तीची नितांत आवश्यकता आह.

करीता सेवेशी नम्र विनंती की, शासन स्तरावरून राज्यातील सर्व कॉलेज, शाळा, औ.प्र. संस्था, उच्च प्राथ. शाळा यातील सबंधीतांना शासन परीपत्रकाद्वारे लेखी सुचना देवून हा उपक्रम राबविणेबाबत निर्देश देण्याची कृपा करावी.

सोबत :- हया परिक्षांचे माहितीपत्रक (परिपत्रक) व पोस्टर आपल्या माहितीकरीता व पुढील आवश्यक कार्यवाहीकरीता सविनय सादर करण्यात येत आहे.

कष्टाबद्यल क्षमस्व !

दिनांक :

साहेबराव गोहणे (ग्रामगीताचार्य)
अध्यक्ष
अ.भा.श्री गुरूदेव सेवा मंडळ
शाखा कळमेश्वर, जि. नागपूर

॥ श्रीगुरुदेव ॥

**संस्थापक - वं. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज**

***अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळ, गुरुकुंज-आश्रम व्दारा संचालित***

# ग्रामगीता जीवन विकास परीक्षा विभाग, गुरुकुंज आश्रम



**ता. तिवसा, जि. अमरावती (महाराष्ट्र) पिन - ४४४९०२**

**(दूरध्वनी क्र. ०७२२५ - २२४५६६)**

## * परिपत्रक *

*जीवन विकासाचे शिक्षण । गावीच असावे सर्व संपन्न।*
*आपुल्याचि ग्रामरचनेचे आयोजन। शोभवाया शिकवावे ॥*

- ग्रामगीता (अ. १९/जीवन-शिक्षण)

### परीक्षेचा उद्देश -

मानवतेचे महान पुजारी, ग्रामगीतेचे जनक, सहस्त्रपैलू व्यक्तिमत्वाचे धनी, क्रांतदर्शी, विश्वयोगी, युगप्रवर्तक **वं. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज** यांचे अवतारकार्य, तत्वज्ञान व समग्र साहित्य तसेच त्यांच्याच व्दारा संस्थापित अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळ, गुरुकुंज आश्रम ची कार्यप्रणाली व तत्वप्रणाली इ. बाबींच्या अभ्यासातून समाजाच्या सर्व क्षेत्रातील व सर्व स्तरातील जनतेवर प्रामुख्याने विद्यार्थ्यांवर राष्ट्र-नवनिर्माणाकरिता सुसंस्कार व्हावेत या उदान्त हेतूने काळाची गरज लक्षात घेवून अ. भा. श्रीगुरुदेव सेवा मंडळ, गुरुकुंज-आश्रम व्दारा **प्रजासत्ताक दिन २६ जानेवारी १९९० पासून ग्रामगीता जीवन विकास परीक्षा विभागाचा** अत्यंत उपयुक्त व स्तुत्य असा उपक्रम सुरु करण्यात आलेला आहे.

ह्या परीक्षांच्या माध्यमातून शाळा, महाविद्यालये, विविध प्रशिक्षण संस्था, सेवाभावी संस्था, विद्यार्थी-शिक्षक-पालक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, समाजातील स्त्री-पुरुष, युवक- युवती ह्या सर्वांना सुसंस्काराचे, आदर्श जीवनाचे, मूल्य- शिक्षणाचे, राष्ट्रभक्तीचे, सदाचाराचे, स्वावलंबनाचे धडे मिळून सदाचारी, निर्व्यसनी, कर्तबगार व स्वावलंबी समाजनिर्मिती होवून आमच्या देशाचे नागरिक राष्ट्रभक्ती करणारे, विशाल बुध्दीचे, राष्ट्रपुरुष निर्माण व्हावे आणि राष्ट्रविकासाचा मार्ग सुलभ व्हावा या संकल्पनेतून ह्या परीक्षांचा उपक्रम सुरु आहे.

### परीक्षांचे इतिवृत्त -

मागील तेवीस वर्षात ह्या परीक्षांमध्ये सर्व स्तरातील व सर्व क्षेत्रातील लाखो लोक, शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक- पालक, प्रवचनकार, कीर्तनकार, प्रचारक, कार्यकर्ते इत्यादींनी सहभागी होवून स्वत:च्या आत्मविकासाबरोबरच प्रापंचिक व पारमार्थिक विकास साधलेला आहे. ह्या परिक्षांच्या मालिकेतील शेवटच्या **'ग्रामगीताचार्य'** या परिक्षेत आतापर्यंत १३७ परीक्षार्थी उत्तीर्ण होवून त्यांनी स्वत:ला श्रीगुरुदेव सेवा मंडळाच्या कार्याला वाहून घेतलेले आहे व श्रीगुरुदेव सेवा मंडळाच्या माध्यमातून आपापल्या क्षेत्रात ग्राम नवनिर्माणाचे राष्ट्रीय कार्य करीत आहेत.

### परीक्षा पध्दती -

ह्या परीक्षा वर्षातून एकदा खालील सहा गटात घेण्यात येतात. त्यासंबंधीची संक्षिप्त माहिती येणेप्रमाणे-

| क्र. | गट क्र. | परीक्षेचे नाव | पाठ्यपुस्तक | प्रवेश शुल्क | प्रवेशाची पात्रता | परीक्षेची तिथी | परीक्षेचे स्थळ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पहिला | प्रवेश | ग्रामगीता बोधामृत पुस्तक १ ले | रु.१५ | वर्ग ५ ते ७ | गट १ ते ५ दरवर्षी | गट१ ते५ ज्या ठिकाणी |
| २ | दुसरा | परिचय | ग्रामगीता बोधामृत पुस्तक २ रे | रु.२० | वर्ग ८ ते १० | जानेवारीच्या | कमीत कमी ५० |
| ३ | तिसरा | प्रविण | ग्रामगीता बोधामृत पुस्तक ३ रे | रु.३० | मॅट्रीकनंतर सर्व | पहिल्या रविवारी. | परीक्षार्थी असतील |
| ४ | चवथा | ग्रामनाथ | ग्रामगीता बोधामृत पुस्तक ४ थे | रु. ५० | प्रविण उत्तीर्ण | ग्रामगीताचार्य | त्या प्रत्येक केंद्रावर. |
| ५ | पाचवा | ग्रामगीतारत्न | ग्रामगीता बोधामृत पुस्तक ५ वे | रु. १०० | ग्रामनाथ उत्तीर्ण | दरवर्षी जानेवारीच्या | ग्रामगीताचार्य |
| ६ | सहावा | ग्रामगीताचार्य | वं. राष्ट्रसंतांचे समग्र साहित्य | रु. ३०० | ग्रामगीतारत्न उत्तीर्ण | दुसऱ्या रविवारी. | गुरुकुंज आश्रम येथे. |

### परीक्षेचे नियम व अटी :

१) प्रवेश पत्रिका व परीक्षा शुल्क परीक्षा विभागाला पाठविण्याची अंतिम तिथी दरवर्षी **३० सप्टेंबर. यानंतर कोणत्याही परिस्थितीत प्रवेश पत्रिका स्विकारल्या जाणार नाहीत.**

| रोल नंबर | अ. क्र. | परीक्षार्थ्याचे पूर्ण नाव | शिक्षण | परीक्षा केंद्रावर परीक्षेला उपस्थित परीक्षार्थ्याची सही |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | २८ | | | |
| | २९ | | | |
| | ३० | | | |
| | ३१ | | | |
| | ३२ | | | |
| | ३३ | | | |
| | ३४ | | | |
| | ३५ | | | |
| | ३६ | | | |
| | ३७ | | | |
| | ३८ | | | |
| | ३९ | | | |
| | ४० | | | |
| | ४१ | | | |
| | ४२ | | | |
| | ४३ | | | |
| | ४४ | | | |
| | ४५ | | | |
| | ४६ | | | |
| | ४७ | | | |
| | ४८ | | | |
| | ४९ | | | |
| | ५० | | | |
| | ५१ | | | |
| | ५२ | | | |
| | ५३ | | | |
| | ५४ | | | |
| | ५५ | | | |

**गोषवारा :** गट - १/प्रवेश - एकूण परीक्षार्थी.......× प्रवेश शुल्क रु. १५ = एकूण परीक्षा शुल्क रु...............

गट - २/परिचय - एकूण परीक्षार्थी.......× प्रवेश शुल्क रु. २० = एकूण परीक्षा शुल्क रु...............

गट - ३/प्रविण - एकूण परीक्षार्थी.......× प्रवेश शुल्क रु. ३० = एकूण परीक्षा शुल्क रु...............

गट - ४/ग्रामनाथ - एकूण परीक्षार्थी.......× प्रवेश शुल्क रु. ५० = एकूण परीक्षा शुल्क रु...............

गट - ५/ग्रामगीतारत्न - एकूण परीक्षार्थी.......× प्रवेश शुल्क रु. १०० = एकूण परीक्षा शुल्क रु...............

गट - ६/ग्रामगीताचार्य - एकूण परीक्षार्थी.......× प्रवेश शुल्क रु. ३०० = एकूण परीक्षा शुल्क रु...............

एकूण परीक्षा शुल्क रु................ (वजा) व्यवस्थापन शुल्क रु............ एकूण बेरीज ......................

......................

निव्वळ परीक्षा शुल्क जमा रु.....................

दिनांक : केंद्र प्रमुखाची सही